असा. क्र. १५ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, एप्रिल २५, २००८/वैशाख ५, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०.**—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. .. पृष्ठे २११-२१४

दिनांक २३ एप्रिल २००८ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**<br>
सचिव, महाराष्ट्र शासन,<br>
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २५ एप्रिल २००८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६४ चा महा. २०. २००८ चा महा. अध्या. १.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक २२ जानेवारी २००८ रोजी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २००८ प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २००८ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २२ जानेवारी २००८ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम १३ मध्ये,— १९६४ चा महा. २०.

(क) पोट-कलम (१) मधील खंड (क) मध्ये, " बाजार क्षेत्रात राहणारे " या मजकुराने सुरू होणाऱ्या व " पंधरा शेतकरी,—" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" बाजार क्षेत्रात राहणारे (ज्यांची संबंधित मतदारसंघाच्या मतदारयादीत नावे असतील असे आणि जे जिल्हाधिकाऱ्याने किंवा, यथास्थिति, जिल्हा उप निबंधकाने याबाबतीत वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास एकवीस वर्षांहून कमी वयाचे नसतील असे) खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पंधरा शेतकरी,— " ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये विद्यमान परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, जर राज्य शासनास इष्ट वाटत असेल तर त्याला, प्रथमच घटित केलेल्या बाजार समितीवर सदस्य नामनिर्देशित करण्याऐवजी, प्रशासकाची किंवा प्रशासक मंडळाची नेमणूक करता येईल आणि अशा रीतीने नेमणूक केलेला प्रशासक किंवा प्रशासक मंडळ, सर्व प्रयोजनांसाठी, प्रथमच घटित केलेली समिती असल्याचे मानण्यात येईल. " .

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १५-क ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५-क मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील खंड (ख) मध्ये,—

(एक) " संचालकाने किंवा अशा प्राधिकृत अधिकाऱ्याने " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " कामकाज पाहण्यासाठी प्रशासक म्हणून असेल. " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी " संचालकाने किंवा अशा प्राधिकृत अधिकाऱ्याने नेमलेला प्रशासक वा प्रशासक मंडळ हे, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून आणि निवडणूक घेतल्यानंतर, पुनर्घटित समितीची गणपूर्ती असलेली पहिली सभा होईल त्या दिवसापर्यंतच्या कालावधीत (यात यापुढे या कलमामध्ये ज्याचा निर्देश " उक्त कालावधी " असा करण्यात आला आहे) समितीचे कामकाज पाहील. " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " प्रशासकाने " या मजकुराऐवजी, " प्रशासकाने वा प्रशासक मंडळाने " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये, " प्रशासकाकडून " या मजकुराऐवजी, " प्रशासकाकडून वा प्रशासक मंडळाकडून " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (३) मध्ये, " प्रशासकाला " या मजकुराऐवजी, " प्रशासकाला वा प्रशासक मंडळाला " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) पोट-कलम (४) मध्ये, " प्रशासकाला " या मजकुराऐवजी, " प्रशासकाला वा प्रशासक मंडळाच्या सदस्यांना " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २१ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २१ मध्ये, " प्रशासक " या मजकुराऐवजी, " प्रशासक वा प्रशासक मंडळ " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० यामध्ये कलम ३५-क समाविष्ट करणे.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

बाजार समितीच्या सचिवाची नियुक्ती करण्याचा शासनाचा अधिकार.

"**३५-क.** कलम ३५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, सहकार विभागातील सहायक निबंधक, सहकारी संस्था, या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या पदावर नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्यास कोणत्याही बाजार समितीचा सचिव म्हणून नियुक्त करता येईल. " .

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ४५ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४५ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये, " **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्याबाबतची कारणे देऊन, " या मजकुराऐवजी, " लेखी आदेशाद्वारे, त्याबाबतची कारणे देऊन " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये,—

(एक) " अधिसूचना प्रसिद्ध केल्यानंतर " या मजकुराऐवजी, " आदेश काढण्यात आल्यानंतर " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (क) मध्ये " अशा प्रसिद्धीच्या तारखेपासून " या मजकुराऐवजी, " अशा आदेशाच्या दिनांकापासून " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) खंड (ग) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (ग) राज्य शासनास, बाजार समितीची कार्ये पार पाडण्याकरिता, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, आदेशाद्वारे, एकतर प्रकरण तीनच्या तरतुदींअनुसार नवीन बाजार समिती घटित करता येईल किंवा प्रशासकाची वा प्रशासक मंडळाची नियुक्ती करता येईल ; " ;

(चार) परंतुकामध्ये,—

(क) " प्रशासक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती " या मजकुराऐवजी, " नियुक्त केलेला प्रशासक वा प्रशासक मंडळ " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) " अशा व्यक्तीने " या मजकुराऐवजी, " प्रशासकाने वा प्रशासक मंडळाने " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) " त्या प्रशासकास " या मजकुराऐवजी, " त्या प्रशासकास वा प्रशासक मंडळास" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (२क) पोट-कलम (१) अन्वये काढून टाकण्यात आलेला समितीचा सदस्य, ज्या आदेशाद्वारे त्याला अशा प्रकारे काढून टाकण्यात आले असेल त्या आदेशाच्या दिनांकापासून सहा वर्षांचा कालावधी समाप्त होईपर्यंत, समितीचा सदस्य म्हणून पुन्हा निवडून येण्यास, पुन्हा नियुक्त केला जाण्यास, पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास, स्वीकृत करून घेतला जाण्यास वा पुन्हा स्वीकृत करून घेतला जाण्यास पात्र असणार नाही. ".

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ५७ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५७ मधील पोट-कलम (१) मध्ये, " राज्य शासनाला " या मजकुरानंतर " किंवा राज्य कृषि पणन मंडळाला " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २००८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ याचे निरसन व व्यावृत्ती.

**८.** (१) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २००८ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००८ चा महा. अध्या. १.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारित केल्याप्रमाणे मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींअन्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ३०

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, एप्रिल २५, २००८/वैशाख ५, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) (Amendment) Act, 2008 (Mah. Act No. X of 2008), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. X OF 2008.

*[First published, after having received the assent of the Governor, in the " Maharashtra Government Gazette ", on the 25th April 2008.]*

An Act further to amend the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) Act, 1963.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take
Mah. XX of 1964. immediate action further to amend the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) Act, 1963, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the
Mah. Ord. I of 2008. Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) (Amendment) Ordinance, 2008, on the 22nd January 2008 ;

AND WHEREAS it is expendient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Fifty-ninth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

1. (*1*) This Act may be called the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) (Amendment) Act, 2008.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 22nd January 2008.

Amendment of section 13 of Mah. XX of 1964.

2. In section 13 of the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) Act, 1963 (hereinafter referred to as "the principal Act"),— Mah. XX of 1964.

(*a*) in sub-section (*1*), in clause (*a*), for the portion beginning with the words "fifteen agriculturists" and ending with the words "as specified below :—", the following shall be substituted, namely :—

"fifteen agriculturists residing in the market area (being persons whose names appear in the voter's list for the concerned constituency and who are not less than twenty-one years of age on the date specified, from time to time, by the Collector or the District Deputy Registrar, as the case may be, in this behalf), as specified below :—" ;

(*b*) in sub-section (*2*), after the existing proviso, the following proviso shall be added, namely :—

"Provided further that, the State Government may, if it considers expedient, instead of nominating the members of the Market Committee constituted for the first time, appoint an Administrator or the Board of Administrators, and the Administrator or the Board of Administrators, so appointed, shall, for all purposes, be considered to be the Committee constituted for the first time.".

Amendment of section 15A of Mah. XX of 1964.

3. In section 15A of the principal Act,—

(*a*) in sub-section (*1*), in clause (*b*),—

(*i*) for the words "the person appointed by the Director or such authorised officer, from time to time, shall be the Administrator to manage the affairs of the Committee" the words "the Administrator or the Board of Administrators appointed by the Director or such authorised officer shall manage the affairs of the Committee" shall be substituted ;

(*ii*) for the words "the Administrator" the words "the Administrator or the Board of Administrators" shall be substituted ;

(*b*) in sub-section (*2*), for the words "the Administrator" the words "the Administrator or the Board of Administrators" shall be substituted ;

(*c*) in sub-section (*3*), for the word "Administrator" the words "Administrator or the Board of Administrators" shall be substituted ;

(*d*) in sub-section (*4*), for the word " Administrator " the words " Administrator or the members of the Board of Administrators " shall be substituted.

**4.** In section 21 of the principal Act, for the words " the Administrator " the words " the Administrator or the Board of Administrators " shall be substituted. Amendment of section 21 of Mah. XX of 1964.

**5.** After section 35 of the principal Act, the following section shall be inserted, namely :— Insertion of section 35A in Mah. XX of 1964.

" **35A.** Notwithstanding anything contained in section 35, the State Government may appoint any officer, not below the rank of Assistant Registrar of Co-operative Societies, from the Co-operation Department, as the Secretary of any Market Committee. ". Power of Government to appoint Secretary of Market Committee.

**6.** In section 45 of the principal Act,— Amendment of section 45 of Mah. XX of 1964.

(*a*) in sub-section (*1*), for the words " by notification in the *Official Gazette*, with reasons therefor " the words " by an order in writing, with reasons therefor " shall be substituted ;

(*b*) in sub-section (*2*),—

(*i*) for the words " Upon the publication of a notification " the words " On issuing of an order " shall be substituted ;

(*ii*) in clause (*a*), for the words " from the date of such publication " the words " from the date of such order " shall be substituted ;

(*iii*) for clause (*c*), the following clause shall be substituted, namely :—

" (*c*) the State Government may, by order, either constitute a new Market Committee in accordance with the provisions of Chapter III or appoint an Administrator or the Board of Administrators to carry out the functions of the Market Committee as it thinks fit ;";

(*iv*) in the proviso,—

(*A*) for the words " person appointed as an Administrator " the words " the Administrator or the Board of Administrators appointed " shall be substituted ;

(*B*) for the words " If such person " the words " If the Administrator or the Board of Administrators " shall be substituted ;

(*C*) for the word " Administrator" the words " Administrator or the Board of Administrators " shall be substituted ;

(*c*) after sub-section (*2*), the following sub-section shall be inserted, namely :—

"(*2A*) The member of the Committee, who has been removed under sub-section (*1*) shall not be eligible for being re-elected, re-appointed, re-nominated, co-opted or re-co-opted as a member of the Committee, till the expiry of a period of six years from the date of the order by which he has been so removed.".

Amendment of section 57 of Mah. XX of 1964.

**7.** In section 57 of the principal Act, in sub-section (*1*), after the words "State Government" the words "or the State Marketing Board" shall be inserted.

Repeal of Mah. Ord. I of 2008 and saving.

**8.** (*1*) The Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) (Amendment) Ordinance, 2008, is hereby repealed. Mah. Ord. I of 2008.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken under the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done or taken under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.